Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
स.नं.८३२-ए, फा.प्लॉट नं.१७८, व १७९ बालचित्रवाणीजवळ,
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे / तातडीचे

क्र.रा.मं./परीक्षा-७/ ४५२
पुणे ४११ ००४.
दिनांक- ०२/०२/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:- फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ:- १.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण–२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दि.२४/११/२०१७.
२.महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.कशिमं/शारेप/सहा/२०२५/१३०० दि.०४/१२/२०२५.
३.या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/१६६ दि.१६/०१/२०२६ चे पत्र
४.कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे संकीर्ण–३८२६/प्र.क्र.०३/एस.डी.२,दि.३०/०१/२०२६ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येते. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ५ मध्ये याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळेकडे दि.१५ डिसेंबर अखेर व माध्यमिक शाळांनी संबंधित विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिडीएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२५ चा निकाल जानेवारी २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळांकडे सादर करण्यासाठी दि.३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

याबाबत संदर्भ पत्र क्र. ३ च्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर केला असता, शासनाने संदर्भ क्र.४ नुसार फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे दिनांक १८/०२/२०२६ पर्यंत सादर करण्यास मुदतवाढ दिलेली आहे.

तरी उपरोक्तनुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरून याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने)

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

प्रत माहितीस्तव सादर,

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२.
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१.
३. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – ३०.
४. मा. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई –०१.
५. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई – ०१.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –
मा.व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.

जा.क्र पुविमं/माध्य शाखा क/ 782
पुणे–४११००५
दिनांक : 08 /०२/२०२६

प्रति,

मुख्यध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० वी परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ : राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/४५२, दिनांक ०२/०२/२०२६ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा यांना कळविण्यात येते की, फेब्रु–मार्च २०२६ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी मुख्याध्यापक, सर्व माध्यमिक शाळा यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेवून त्याप्रमाणे पुढील आवश्यक ती उचित कार्यवाही करावी. तसेच सदर बाब सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे निदर्शनास आणून दयावी व केलेल्या कार्यवाही अहवाल या कार्यालयास सादर करावा.

MBRaut
(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

1. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – ४११ ००१
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

G:\EXAM-7-2026.docs-37

प्रत माहितीस्तवः– मा.सचिव राज्यमंडळ,पुणे.